**<u>ठळक बातम्या</u>**

- पहलगाममधल्या दहशतवादी हल्ल्याला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्तानं देशभरातून अभिवादन

- इराणबरोबरची शस्त्रसंधी अमर्यादित काळासाठी वाढवत असल्याची अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा

- होर्मुझच्या सामुद्रधुनीत एका जहाजावर इराणचा हल्ला, शस्त्रसंधी मोडून काढत हेजबोल्लाचे इस्राइलवर हल्ले

आणि

- आयपीएलमधल्या सट्ट्याप्रकरणी आंध्रप्रदेशातून १२ जणांना अटक

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीर मधल्या पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्याला आज एक वर्ष पूर्ण होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पहलगाममधल्या दहशतवादी हल्ल्याच्या पहिल्या स्मृती दिनानिमित्त पीडितांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांनी या भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निरपराध नागरिकांच्या स्मृती देशाच्या सामूहिक स्मरणात कायम राहतील, असं सांगत त्यांच्या कुटुंबासोबत देश एकजुटीने उभा असल्याचं म्हटलं. तर, प्रधानमंत्री मोदी यांनीही देश दहशतवादापुढे कधीही झुकणार नाही, असा निर्धार व्यक्त करत पीडितांना कधीही विसरणार नसल्याचं सांगितलं. शोकाकुल कुटुंबीयांप्रती त्यांनी संवेदना व्यक्त केल्या.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह इतर मान्यवरांनीही पहलगाम हल्ल्याप्रकरणी शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातलं मतदान उद्या २३ एप्रिलला होणार आहे. यामध्ये १६ जिल्ह्यांतील १५२ जागांसाठी मतदार कौल देतील. एक

हजार चारशे ७८ उमेदवारांचं भविष्य उद्या मतपेटीत बंद होईल. राज्यात भयमुक्त, निष्पक्ष आणि शांततापूर्ण वातावरणात मतदान पार पडावं यासाठी निवडणूक आयोगानं दक्षता घेतली आहे. राज्यात दुसऱ्या टप्प्यातलं मतदान २९ एप्रिल रोजी होणार आहे.

तामिळनाडूमध्ये उद्या एकाच टप्प्यात २३४ विधानसभा जागांसाठी मतदान होणार आहे. राज्यातील पाच कोटी ७३ लाख ४३ हजार मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील. बारामती आणि राहुरी या दोन विधानसभा मतदारसंघांतही पोटनिवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे.

**<><><><><>**

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याविषयी कथितरित्या केलेल्या अपमानास्पद वक्तव्याप्रकरणी भाजपाच्या शिष्टमंडळाने आज निवडणूक आयोगाची आज भेट घेतली. या प्रकरणी निवडणूक आयोगाने कठोर कारवाई करावी तसंच खरगे यांनी देशाची माफी मागावी अशी मागणी त्यांनी केली आहे. या शिष्टमंडळात अर्थमंत्री निर्मला सीतारामन, किरेन रिजिजू, अर्जुन राम मेघवाल आणि अर्जुन सिंह या मंत्र्यांचा समावेश होता. असं वक्तव्य करणं लोकशाहीविरोधी असल्याचं मंत्री किरेन रिजिजू यानी म्हटलं आहे. काँग्रेस प्रधानमंत्र्यांविरोधात वारंवार अशी भाषा वापरत असल्याचं निर्मला सीतारामन म्हणाल्या.

**<><><><><>**

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी आज उत्तर प्रदेशात शेखा झील पक्षी अभयारण्याला रामसर स्थळ म्हणून घोषित केलं. हे उत्तर प्रदेशातलं बारावं आणि देशातलं ९९वं रामसर स्थळ असल्याचं यादव समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले. हे अभयारण्य मध्य आशियाई भागात स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांसाठी एक महत्त्वाचं आश्रय स्थान आहे. या भागात हिवाळ्याच्या मोसमात बार हेडेड गूस, पेंटेड स्टॉर्क आणि विविध प्रकारच्या बदकांसारख्या स्थलांतरित पक्षांचा अधिवास असतो. या अभयारण्याच्या समावेशामुळे स्थानिक उपजीविकेला चालना मिळेल, असा विश्वास यादव यांनी आपल्या संदेशात व्यक्त केला.

**<><><><><>**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी ४ संशयितांना मुंबई उच्च न्यायालयानं आज दोषमुक्त केलं आणि त्यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करायचा विशेष न्यायालयाने दिलेला निर्णय रद्दबातल ठरवला. मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या पीठानं हा निर्णय दिला. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात या चौघांविरुद्ध आरोपपत्र करायचे आदेश विशेष न्यायालयानं दिले होते.

**<><><><><>**

उत्तराखंडमधल्या चारधाम यात्रेतल्या केदारनाथ मंदिराचे दरवाजे आज सकाळी भाविकांसाठी उघडण्यात आले. देशाच्या कानाकोपऱ्यातले हजारो भाविक यावेळी उपस्थित होते. यावेळी भाविकांसाठी केलेल्या उपाययोजनांविषयी मंदिराचे पुजारी उमेश चंद पोस्ती म्हणाले

**- - होल्ड - बाइट उमेश चंद - - -**

गंगोत्री आणि यमुनोत्रीचे दरवाजे १९ एप्रिल रोजी उघडले असून बद्रीनाथचे दरवाजे उद्या उघडले जातील.

यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना स्वच्छता, पर्यावरण रक्षण, सेवाभाव, शिस्त आणि स्थानिक वस्तूंची खरेदी याविषयी ५ संकल्प घेण्याचं आवाहन केलं.

**<><><><><>**

इराणसोबतची शस्त्रसंधी अमर्याद काळासाठी वाढवण्यात आल्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. इराणसोबत चर्चा करण्यासाठी हे आवश्यक असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. इराणसोबतची दोन आठवड्यांची शस्त्रसंधी आज सकाळी संपली, त्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी ही घोषणा केली आहे. पाकिस्तानचे प्रधानमंत्री शाहबाज शरीफ आणि फिल्ड मार्शल असीम मुनीर यांच्या विनंतीवरून आपण हा निर्णय घेतल्याचंही त्यांनी सांगितलं. मात्र अमेरिकन नौदल इराणच्या बंदरावरची नाकेबंदी सुरूच ठेवेल असंही त्यांनी स्पष्ट केलं. यावर इराणच्या प्रमुख नेत्यांकडून कोणतीही प्रतिक्रिया आली नाही. मात्र इराणने शस्त्रसंधीची मुदत वाढवण्याबाबत कसलीही मागणी केली नव्हती असं इराणच्या रिव्हॉल्युशनरी गार्डशी संबंधित तसनिम वृत्तसंस्थेने म्हटलं आहे, तसंच बंदरांवरली नाकेबंदी इराण तोडेल असा इशाराही दिला आहे.

संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस एँतोनियो गुटेरस यांनी ट्रम्प यांच्या घोषणेचं स्वागत केलं असून इराण आणि अमेरिका यांच्यात विश्वासाचं वातावरण निर्माण करण्यासाठी हे एक महत्त्वाचं पाऊल आहे असं म्हटलं आहे. अमेरिका आणि इराणमधे वाटाघाटी घडवून आणण्यासाठी पाकिस्ताननं केलेल्या प्रयत्नांचं गुटेरस यांनी कौतुक केलं आणि या संघर्षावर कायमचा तोडगा निघेल अशी आशा व्यक्त केली.

पाकिस्तानचे प्रधानमंत्री शाहबाज शरीफ यांनीही ट्रम्प यांच्या घोषणेवर समाधान व्यक्त केलं. यामुळे दोन्ही देश सर्वसमावेशक शांतता करार करू शकतील असं ते म्हणाले.

**<><><><><>**

इराणचं निमलष्करी दल रिव्हॉल्युशनरी गार्डने आज सकाळी होर्मुजच्या सामुद्रधुनीत एका मालवाहू जहाजावर हल्ला केला. ब्रिटनच्या सागरी व्यापार संचलन केंद्राने ही माहिती दिली आहे. जहाजावर हल्ला करण्याआधी कोणतीही पूर्वसूचना दिली नव्हती, असंही त्यांनी म्हटलं आहे. यात जीवितहानी झाली नाही. इराणकडून कोणतीही प्रतिक्रिया आली नाही. मागच्या आठवड्यात अमेरिकेने इराणच्या एका मालवाहू जहाजावर हल्ला करून ते जप्त केलं होतं, त्यानंतर  इराणकडून ही कारवाई करण्यात आली.

**<><><><><>**

हिजबोलानं आज इस्त्रायलवर ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ला केला. इस्त्रायलने शस्त्रसंधीचं उल्लंघन करत दक्षिण लेबननमधे हल्ले केल्यानंतर पहिल्यांदाच हा हल्ला केल्याचं हिजबोलानं म्हटलं आहे. तर दक्षिण लेबननमधे बफर झोन कायम ठेवण्यात आल्याचं इस्त्रायलने म्हटलं आहे. यात दक्षिण लेबननमधल्या अनेक खेड्यांचा समावेश आहे. या गावांमधल्या नागरिकांना परत येण्यास इस्त्रायलने मज्जाव केला आहे.

**<><><><><>**

होर्मुझच्या सामुद्रधुनीत निर्माण होणाऱ्या अडथळ्यांमुळे भारताच्या आर्थिक आणि सुरक्षाविषयक स्थैर्यावर परिणाम होतो, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग म्हणाले. जर्मनीच्या संसदेच्या संरक्षण आणि सुरक्षाविषयी स्थायी समितीला ते बर्लिनमध्ये संबोधित करत होते. जगाला सध्या नव्या प्रकारचे धोके जाणवत असून तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या बदलांमुळं परिस्थिती अतिशय जटील झाल्याचं ते म्हणाले.

गेल्या दशकांमध्ये भारत आणि जर्मनी यांच्यातले संबंध दृढ झाल्याचं राजनाथ सिंग काल म्हणाले. केवळ राजकीय आणि धोरणात्मकच नव्हे तर कला, संस्कृती यासारख्या क्षेत्रातही दोन्ही देशांमध्ये संबंध असल्याचं त्यांनी जर्मनीतल्या भारतीयांना संबोधित करताना सांगितलं. दोन्ही देशांमधल्या अधिकृत संबंधांना यावर्षी ७५ वर्ष पूर्ण झाले आहेत. जर्मनीला युरोपातला भारताचा दुसऱ्या क्रमांकाचा व्यापारी भागिदार असल्याचंही ते म्हणाले.

**- - होल्ड - राजनाथ सिंग - - -**

**- <><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेवर सट्टेबाजी करणारं एक रॅकेट आंध्रप्रदेशातल्या नेल्लोर इथं उघडकीस आलं असून यात बारा जणांना अटक झाली आहे. यातले दोघं फरार झाल्याचं पोलिसांनी सांगितलं. १९ एप्रिलला एका हॉटेलवर छापेमारी केल्यानंतर हा प्रकार समोर आला. यात पोलिसांनी दोन लाखांची रोकड, १३ मोबाईल आणि एक दूरचित्रवाणी संच जप्त केला आहे. या टोळीनं पैशांच्या व्यवहारासाठी ९ बँका आणि १४ फोन नंबरचा वापर केला, एप्रिल २०२५ ते एप्रिल २०२६ या काळात ३७ लाख रुपयांचे व्यवहार झाल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**//<><><><><>//**